# आरएसएस जनकल्याण समितीला रुग्णवाहिका दान



**पनवेल :** भारतातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा वाढवण्याच्या सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून पनवेल येथील आरएसएस जनकल्याण समितीसाठी क्लिक हिल फाउंडेशन या क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने आरोग्य यान अर्थात ॲम्ब्युलन्स पुरवली आहे.

पनवेल महापालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, क्विक हिल टेक्नोलॉजीजचे एमडी आणि सीईओ कैलाश काटकर, सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, क्विक हिलच्या सीएसआर ॲक्टिव्हिटी आणि आरोग्य यानामागील प्रणेत्या सौ. अनुपमा काटकर आणि आरएसएस जनकल्याण समिती, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, उपाध्यक्ष विनायक दंभीर आदि उपस्थित होते.

क्विक हिलचे हे अत्याधुनिक 'आरोग्य यान' रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांना सेवा देईल. यात सर्व खेडी आणि नेरा, तोवेर वाडी, दोधानी, सतीची वाडी, तामसाई, वाघाची वाडी, रानसाई, धामानी, मालडुंगेस सावनसाई, चिंचवली आणि गोडेश्वर आदींचा समावेश आहे. अति दुर्गम भागातील डॉक्टर आणि रुग्णांना प्रवासाकरिता ही उपयुक्त ठरेल. रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना नियमित तपासणी, निदान आणि उपचार यांसारख्या आरोग्य सेवा पुरवल्या जातील. रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेकरिता मोबाईल क्लिनिक युनिटमध्ये रुपांतरीत करता येते. यात स्वच्छ आणि आरोग्यदायी सेटिंग तसेच औषध वितरण आणि साठवणीकरिता मोठा प्लॅटफॉर्मही तयार होऊ शकतो. आरोग्य यान उपक्रमाअंतर्गत क्विक हिलने रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना चांगल्या आरोग्य सेवा पुरवण्याकरिता अगदी नवी. आरएसएस जनकल्याण समिती या भागातील वंचित लोकांकरिता आरोग्य सेवा पुरवून नियमित आरोग्य तपासणीच्या योजना राबवते.